'कृत्रिम बुद्धिमत्ता' आणि 'कृषी क्षेत्र' नव्या परिवर्तनाच्या दिशेने : मुख्यमंत्री फडणवीस >>पान 2

कोल्हापुरात खंडित गॅस पुरवठ्याच्या निषेधार्थ नागरिकांचा रास्ता रोको >>पान 3

जिल्ह्यातील १३ तालुके आपत्तीग्रस्त घोषित >>पान 4

**सुविचार**

संयम आणि धैर्य यशाचे मुख्य घटक आहेत.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 75 ■ रविवार, दि. 12 ऑक्टोबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



दोन बायका अन् फजिती ऐका! युट्यूबर अरमान मलिकनं घेतलेल्या निर्णयाने चाहतेही आश्चर्यचकित

आतील पान

# जमीन मोजणी आता होणार अवघ्या ३० दिवसात

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचा महत्त्वाचा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी : महसूल विभागामार्फत करण्यात येणाऱ्या जमीन मोजणीसंदर्भात अतिशय महत्वाची बातमी समोर आली आहे. जमीन मोजणी आता अवघ्या ३० दिवसात होणार आहे. राज्याचे महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या संदर्भात अतिशय महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. परिणामी या निर्णयामुळे जमीन मोजणीचे कोट्यवधी प्रकरणे मार्गी लागणार आहे. मिळलेल्या माहितीनुसार, जमीन मोजणी प्रकरणांचा ३० दिवसात निपटारा करण्यासाठी परवानाधारक खाजगी भूमापकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. राज्य सरकारकडून या संदर्भात अधिसूचना जारी करण्यात आली आहे. यात पोटहिस्सा, हद्द कायम, बिनशेती, गुंठेवारी, संयुक्त भूसंपादन मोजणी, वनहक्क दावे मोजणी, नगर भूमापन मोजणी, गावठाण भूमापन मोजणी व सिमांकन आणि मालकीहक्कासाठी मोजणी प्रक्रिया अत्यावश्यक असणार आहे.**

या आधी राज्यातील शेतकऱ्यांच्या जमीन मोजणीबाबत मोठा निर्णय घेण्यात आलाय. शेतीची, जमीनीच्या हिस्सेवाटप मोजणी शुल्कात मोठी कपात करण्यात आली आहे. राज्यातील जमिनींची हिस्सेवाटप मोजणी अवघ्या २०० रुपयांमध्ये होणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी हा महत्वपूर्ण निर्णय घेतलाय. पूर्वी १००० ते ४००० रुपये प्रति हिस्सा असे आकारण्यात येणारे शुल्क आता अवघ्या २०० रुपयावर करण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना जमिनीची मोजणी कमी खर्चात करता येणार आहे.



जमीन मोजणी ही शेतकऱ्यांसाठी आणि जमीन मालकांसाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. जमिनीच्या सीमांचे निर्धारण अचूकपणे करण्यासाठी मोजणी आवश्यक असते. बऱ्याच वेळा जमिनीच्या सीमांवरून वाद निर्माण होतात, त्यामुळे या मोजणीला प्राधान्य दिलं जातं. शिवाय जमिनीच्या खरेदी विक्रीसाठी व न्यायालयीन प्रकरणांसाठी सरकारचा जमीन मोजणीचा अहवाल महत्त्वाचा ठरतो.

**जमीन मोजणीचे तीन प्रकार**

साधी मोजणी: साधी जमीनीची मोजणी करण्यासाठी साधारण सहा महिने लागतात. यासाठी सरकारला १००० रुपये जमीन मोजणी शुल्क भरावे लागते.

तातडीची मोजणी: आपल्या जमिनीची मोजणी तातडीने करण्यासाठी ही तीन महिन्यांची असलेली जमीन मोजणीची प्रक्रीया आहे. यासाठी जमीन मालकाला किंवा शेतकऱ्याला सरकारला २००० रुपयांचे मोजणी शुल्क भरावे लागते.

अतितातडीची मोजणी: यात दोन महिन्यांच्या कालावधीत जमीनीची मोजणी केली जाते. यासाठीचे मोजणी शुल्क ३००० रुपये आहे.

# उद्धव ठाकरेंचा हंबरडा मोर्चा

## ५० खोके घेणाऱ्यांनी हेक्टरी ५० हजारांची मदत द्यावी; सरकारचे पॅकेज ही इतिहासातील सर्वात मोठी थाप : ठाकरे



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या, या मागणीसाठी ठाकरेंची शिवसेना आज रस्त्यावर उतरली. छत्रपती संभाजीनगरमध्ये पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी हंबरडा मोर्चा काढण्यात आला. माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे देखील मोर्चात सहभागी झाले. यावेळी उद्धव ठाकरेंनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

उद्धव ठाकरे म्हणाले की, पंधरा दिवसांपूर्वी मी मराठवाड्यात आलो होतो. शेतकऱ्यांना भेटलो तेव्हाच मी जाहीर केलं जोपर्यंत हे सरकार कर्जमाफी करत नाही, तोपर्यंत या सरकारला आम्ही सोडणार नाही. गेल्या वेळेला आलो तेव्हा पाऊस होता, यावेळी आलो तेव्हा कडक ऊन आहे. इतर वेळेला शिवसेना तुमच्यासोबत आहेच पण ज्यावेळेस तुमच्यावर संकट येईल त्यावेळेस शिवसेना तुमच्या खांद्याला खांदा लावून सोबत आहे. हेक्टरी ५० हजार रुपयांच्या मदतीची मागणी शेतकऱ्यांशी बोलूनच केली आहे. सरकारने जाहीर केलेले पॅकेज शेतकऱ्यांना अमान्य आहे. सरकारचे पॅकेज ही मोठी थाप असून स्वतः चीच पाठ खाजवून घेत आहेत, थोपटून घेत आहेत, असा हल्लाबोल त्यांनी केला.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, पन्नास हजार रुपये हेक्टरी आपण कोणाकडे मागत आहोत तर ५० खोके ज्यांनी घेतले आहे त्यांच्याकडे मागत आहोत. त्यामुळे ते सहजासहजी वठणीवर येणार नाहीत. तुम्हाला चाबूक हातात घ्यावा लागेल आणि यांना बरोबर वठणीवर आणावे लागेल. पॅकेज पाहिल्यावर सगळ्यांना असं वाटलं की इतिहासातलं सर्वात मोठं पॅकेज आहे. पण नाही ही इतिहासातली सर्वात मोठी थाप आहे. आजपर्यंत इतकी मोठी थाप कोणत्याही सरकारने मारलेली नाही. इतकी मोठी थाप देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने मारलेली आहे. काल, परवा देशाचे पंतप्रधान मुंबईत येऊन गेले. त्यांच्या भाषणामध्ये शेतकऱ्यांबद्दल काही उल्लेख होता का? ज्या पंतप्रधानांना आपण जिथे चाललो आहोत तिथली परिस्थिती माहित नाही तर आपण त्यांच्याकडे काय न्याय मागत आहोत? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

कैलास तुम्ही जे म्हणालात राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला. पण आता एका क्षेत्र शेतकऱ्याने सांगितले की, साहेब हातात टरबूज दिला. ही शेतकऱ्यांची थट्टा चाललेली आहे. मी या सरकारने जाहीर केलेल्या पॅकेजचे समर्थन करायला तयार आहे. पण माझी एक अट आहे. मुख्यमंत्री बोललेत खरडून गेलेल्या जमिनीला पर हेक्टरी मनरेगातून साडेतीन लाख रुपये देणार आहोत. मग मी मुख्यमंत्र्यांना आव्हान देतोय की, तुमची नियत असेल तर दिवाळीपूर्वी तीन लाखातील एक लाख रुपये माझ्या शेतकऱ्यांच्या अकाउंटमध्ये जमा करा, असे आव्हान उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले.

>>पान २

# दिल्लीत सुधीर मुनगंटीवारांनी घेतली अमित शाहांची भेट

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्र भाजपाचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी नुकताच दिल्ली दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी केंद्रातील अनेक महत्त्वाच्या नेत्यांची भेट घेतल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. विशेषतः, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी झालेल्या भेटीमुळे आगामी काळात मुनगंटीवार यांना पक्षात नव्या जबाबदाऱ्या देण्यात येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दिल्लीतील दौऱ्यात मुनगंटीवार यांनी सर्वप्रथम केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना मुनगंटीवार यांनी स्पष्ट केलं की, मी मंत्रीपदासाठी किंवा कोणतीही पदे मिळावीत म्हणून दिल्ली दौरा केलेला नाही. राज्यातील प्रश्र्न केंद्रापर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशानेच या भेटी घेतल्या आहेत.

तसेच, राज्यात काही ठिकाणी द्वेषाची भावना पसरवली जात असल्याच्या पार्श्र्वभूमीवर मुनगंटीवार यांनी यावर लक्ष द्यायचे काम गृहमंत्र्यांचे आहे. गृहमंत्री ते काम करतील. तसेच मी मंत्रिमंडळात नाही यामागे पक्षाचे आणखी काही चांगले नियोजन असेल त्यामुळे ते होईल, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, अमित शाह यांना मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील बांबू संशोधन संस्थेत तयार केलेला विशेष तिरंगा आणि डायरी भेट दिल्याची माहिती समोर येत आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, अमित शाह यांच्याशी झालेल्या चर्चेत केवळ राज्यातील प्रश्नच नव्हते, तर काही राजकीय घडामोडींवरही चर्चा झाली. त्यामुळे पक्षाकडून लवकरच मुनगंटीवार यांना कोणतीतरी महत्त्वाची जबाबदारी देण्यात येईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

# तालिबान मंत्र्यांच्या पत्रकार परिषदेवेळी महिला पत्रकारांना बाहेर ठेवले

## विरोधकांच्या टीकेनंतर परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केली भूमिका

नवी दिल्ली : तालिबानचे नेते आणि अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री अमीर खान मुत्ताकी सध्या भारत दौऱ्यावर आहेत. यादरम्यान काल त्यांनी पत्रकार परिषद घेतली होती. या पत्रकार परिषदेत महिला पत्रकारांना प्रवेश नाकारल्यामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. काँग्रेस खासदार प्रियांका गांधी यांच्यासह अनेक नेत्यांनी या घटनेवर जोरदार टीका केली आहे. प्रियांका गांधी यांनी या प्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी केली आहे.

केरळच्या वायनाडमधून खासदार असलेल्या प्रियांका गांधी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे, ''पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, कृपया तालिबानच्या प्रतिनिधीच्या भारत भेटीदरम्यानच्या पत्रकार परिषदेतून महिला पत्रकारांना प्रवेश नाकारल्याच्या घटनेबाबत तुमची भूमिका स्पष्ट करा.''



''जर महिलांच्या हक्कांबाबतची तुमची भूमिका केवळ निवडणूक जिंकण्यासाठीचा दिखावा नसेल, तर मग भारतातील सर्वात सक्षम महिलांपैकी असलेल्या महिला पत्रकारांचा अपमान कसा काय होऊ दिला?'', असा प्रश्नही प्रियांका गांधी यांनी केला आहे.

शुक्रवारी तालिबानचे नेते आणि अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री अमीर खान मुत्ताकी यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत काही मोजक्या पत्रकारांचाच सहभाग होता, तर एकही महिला पत्रकार नव्हती. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याशी बैठक झाल्यानंतर काही तासांतच अमीर खान मुत्ताकी यांनी नवी दिल्लीतील अफगाण दूतावासात ही पत्रकार परिषद घेतली होती.

या पत्रकार परिषदेत एकूण २० पत्रकार उपस्थित होते, परंतु त्यामध्ये एकाही महिला पत्रकाराचा समावेश नव्हता. विविध माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, मुत्ताकी आणि अफगाण दूतावासाच्या अधिकाऱ्यांनीच महिला पत्रकारांचा पत्रकार परिषदेत समावेश न करण्याचा निर्णय घेतला होता.

>>पान २

# सलग पाचव्या दिवशी गो गॅसच्या नागपुरातील कार्यालयसह गोदामावर आयकर विभागाची छापेमारी; कोट्यवधींचं घबाड सापडल्याची माहिती

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर येथील कॉन्फिडेंस पेट्रोलियम इंडिया लिमिटेडच्या कार्यालय आणि गोदामांवर आयकर विभागाची छापेमारीचा आजचा पाचवा दिवस असून पाचव्या दिवशी देखील हि कारवाई सुरु असल्याची माहिती आहे. आतपर्यंत या कारवाईत नितीन खारा यांच्या रामदासपेठ येथील निवासस्थानासह, कंपनीचे गोडाऊन आणि इतर स्थानांचीही तपासणी करण्यात आली आहे. छापेमारी दरम्यान ६-७ कोटींची रोख, दागिने आणि इतर मौल्यवान वस्तू जप्त करण्यात आल्याची माहिती पुढे येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कॉन्फिडेंस पेट्रोलियम इंडिया लिमिटेड ग्रुप 'गो गॅस' प्रकल्प चालवतात. या गो गॅसच्या गोदामातील एलपीजी स्टॉक संदर्भात आयकर विभागाला संशय आहे की कंपनीने बिन परवान्याच्या स्टॉक ठेवला आहे. सोबतच यात मोठी आर्थिक अनियमितता करण्यात आलीय. कारवाईत सुमारे ७५ आयकर अधिकाऱ्यांच्या मोठ्या टीमचा सहभाग असून हि कारवाई आणखी किती दिवस चालते याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

गो गॅसचे नागपुरातील कार्यालय तसेच गोदामावर आयकर विभागाकडून पाचव्या दिवशीही चौकशी सुरु आहे. नागपूरातील रामदास पेठ येथील कार्यालयात मंगळवार सकाळपासून आयकर विभागाचे अधिकारी आणि त्यांचे पथक चौकशी करत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने मुंबईचे पथक असून मुंबईतील अधिकाऱ्यांच्या देखरेखीत ही कारवाई सुरू आहे. व्यवसायासाठी आवश्यक काही परवान्यांची पूर्तता न केल्यामुळे ही कारवाई होत असल्याची माहिती आहे. असे असले तरी अद्याप, आयकर विभागाकडून अजूनही कारवाई नेमकी काय आहे, कोणत्या स्तरावरची आहे, यासंदर्भात कुठलंही अधिकृत वक्तव्य किंवा माहिती देण्यात आलेली नाही.

कोल्हापूरमध्ये बनावट नोटा तयार करणाऱ्या एका मोठ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात आला असून, धक्कादायक बाब म्हणजे या प्रकरणाचा मास्टरमाइंड पोलीस दलातील एक हवालदारच असल्याची माहिती समोर आली आहे. 'कोल्हापूर पोलीस दलातील हवालदारच या प्रकरणाचा मास्टरमाइंड आहे,' अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. याप्रकरणी पोलिसांनी अत्यंत कडक कारवाई करत संबंधित हवालदारासह एकूण पाच आरोपींना ताब्यात घेतले आहे.

# घराचा उंबरठा न ओलांडणारे आता हंबरडा फोडताहेत, एकनाथ शिंदेंची उद्धव ठाकरेंवर टीका



**मुंबई/प्रतिनिधी :** मला फक्त बाळासाहेब ब्रँड माहिती आहे, इतर कोणताही ब्रँड माहिती नाही, महापालिका निवडणुकीत महायुतीलाच यश मिळेल असा विश्र्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. कधी घराचा उंबरठा न ओलंडणारे आता हंबरडा फोडत आहेत. जेव्हा द्यायची वेळ होती तेव्हा आमचे हात रिकामे आहेत-रिकामे आहेत असंच यांचं सुरू होतं असा टोला एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना लगावला.

राज्यातील शेतकरी संकटात आहे, त्यांच्या डोळ्यात अश्रू आहेत, या वेळेस कोणी राजकारण करू नये असं आवाहन एकनाथ शिंदे यांनी केलं. एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या हंबरडा मोर्चावर जोरदार टीका केली.

उद्धव ठाकरे यांच्या हंबरडा मोर्चावर बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, यांना हे उशिरा सुचलेलं शहाणपण आहे. आम्ही शेतकऱ्यांच्या बांधा-बांधावर आम्ही जाऊन आलो. प्रत्यक्ष जाऊन तिथली परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या

>>पान २

# स्वप्नांवर पाणी! जिल्हा बँकेच्या नोकर पदभरतीला स्थगिती

**यवतमाळ/प्रतिनिधी :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेविरोधात केलेल्या तक्रारीवर दहा दिवसांत निर्णय घेण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सहकार विभागाच्या प्रधान सचिवांना दिले आहे.

आता सहकार विभागाने जिल्हा बँकेच्या पदभरतीला अखेर तात्पुरती स्थगिती दिली आहे. नोकर भरती स्थगितीचे आदेश यवतमाळमध्ये धडकताच बँकेत नोकरी लागेल या आशेने अर्ज केलेल्या चार ते पाच हजार बेरोजगारांच्या स्वप्नांवर पाणी फेरले आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेत भरती नियमानुसार ८५५ कर्मचारी आवश्यक आहेत. परंतु कर्मचार्यांची संख्या कमी आहे. सद्य:स्थितीत ५०७ कायम कर्मचारी आहेत. इतर कर्मचारी कंत्राटी, मुख्यमंत्री रोजगार योजनेतंर्गत आहे. याचा बँकेच्या कामकाजावर परिणाम होत असल्याने जिल्हा बँकेने शासनाकडे २६७ कायम कर्मचार्यांच्या पदभरतीची मागणी केली होती.

शासनाने ४ ऑगस्ट २०२५ रोजी १३३ पदांच्या भरतीची परवानगी दिली. बँकेच्या संचालक मंडळांच्या निर्णयानुसार सरळसेवा नोकरभरती प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्याकरिता सहकार आयुक्त व निबंधक यांनी मान्यता दिली. त्याची जाहिरातही प्रसिद्ध झाली. जवळपास चार ते पाच हजार बेरोजगारांनी भरतीसाठी अर्जही दाखल केले.

# पंतप्रधान मोदींकडून शेतकऱ्यांना दिवाळी गिफ्ट!

## ३५ हजार ४४० कोटींच्या दोन नवीन योजनांची घोषणा

**नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज कृषी क्षेत्रासाठी ३५ हजार ४४० कोटी रुपयांच्या दोन प्रमुख योजना सुरू केल्या. यामध्ये आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी डाळींचे अभियान समाविष्ट आहे. समाजवादी नेते जयप्रकाश नारायण यांच्या जयंतीनिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यांनी कृषी, पशुसंवर्धन, मत्स्यपालन आणि अन्न प्रक्रिया क्षेत्रातील ५ हजार ४५० कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या प्रकल्पांचे उद्घाटन केले. सुमारे ८१५ कोटी रुपयांच्या इतर प्रकल्पांची पायाभरणी केली आहे.**

'डाळी स्वावलंबन अभियान' वर ११ हजार ४४० कोटी रुपये खर्च केले जातील आणि २०३०-३१ या पीक वर्षापर्यंत डाळींचे उत्पादन सध्याच्या २५२.३८ लाख टनांवरून ३५० लाख टनांपर्यंत वाढवणे आणि देशाचे आयातीवरील अवलंबित्व कमी करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. तसेच पंतप्रधान धन धन कृषी योजना, ज्याचा एकूण खर्च २४ हजार कोटी आहे. कृषी उत्पादकता वाढवणे, पीक विविधीकरणाला प्रोत्साहन देणे, शाश्र्वत कृषी पद्धतींचा अवलंब करणे आणि पंचायत आणि ब्लॉक पातळीवर साठवणूक सुविधा सुधारणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. निवडक १०० जिल्ह्यांमध्ये सिंचन सुविधा आणि कर्ज उपलब्ध करून दिले जाईल.

पंतप्रधान मोदी शेती, पशुपालन, मत्स्यपालन आणि अन्न प्रक्रिया संबंधित ५४५० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या प्रकल्पांचे उद्घाटन केले, तसेच ८१५ कोटी रुपयांच्या नवीन प्रकल्पांची पायाभरणी देखील करतील. पंतप्रधान ज्या प्रकल्पांचे उद्घाटन करतील त्यात बंगळुरु आणि जम्मू आणि काश्मीरमधील कृत्रिम रेतन प्रशिक्षण केंद्रे, राष्ट्रीय गोकुळ मिशन अंतर्गत आसाममध्ये आयव्हीएफ प्रयोगशाळा, मेहसाणा, इंदूर आणि भिलवाडा येथे दूध पावडर प्लांट आणि प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत तेजपूर येथे माशांच्या खाद्य प्लांटचा समावेश आहे. पंतप्रधानांनी उद्घाटन केलेल्या प्रकल्पांमध्ये बेंगळुरू आणि जम्मू आणि

>>पान २



## आर्थिक राजधानीची नवीन ओळख

'मुंबई मेट्रो-३' आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन हे केवळ पायाभूत सुविधांचे नव्हे, तर 'नवीन मुंबई'च्या आत्मविश्वासाचे प्रतीक ठरले आहे. उपनगरी रेल्वेनंतर पहिल्यांदाच मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनात उत्तर-दक्षिण प्रवासासाठी नवीन मार्ग उपलब्ध झाला आहे. त्यामुळे रोजगार आणि अर्थव्यवस्थेच्या नव्या युगाची सुरुवात झाली आहे, हे नक्की. स्वप्नांची नगरी' म्हणून ओळखली जाणारी महानगरी मुंबई आता, 'स्मार्ट कनेक्टिव्हिटी'च्या युगात प्रवेश करत आहे. प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर 'मुंबई मेट्रो-३' आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या दोन प्रकल्पांचे उद्घाटन झाले. मुंबईला प्राप्त झालेल्या नव्या ओळखीचा हा सुवर्णाध्याय आहे. लाखो मुंबईकरांना प्रथमच उत्तर-दक्षिण अशा प्रवासासाठी मेट्रो मार्गिका उपलब्ध झाल्या असून, आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे मुंबई-नवी मुंबई-ठाणे या प्रदेशाची नोंद जागतिक पटलावर झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील, महायुती सरकारने मुंबईच्या विकासाचा आराखडा प्रत्यक्षात साकारला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली, मुंबईकर अनेक अशक्यप्राय प्रकल्प शक्य झालेले अनुभवत आहे. यात अटल सेतू, मुंबई कोस्टल रोड, समृद्धी महामार्ग, वाढवण बंदर आणि मेट्रोचे जाळे यांचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. फडणवीस यांच्या काळात नियोजनबद्ध पद्धतीने मेट्रोचे जाळे तयार करण्यात आले. अटल सेतूने मुंबई आणि नवी मुंबई यांच्यातील २१.८ किमीचे अंतर फक्त काही मिनिटांच्या अंतरावर आणले, तर समृद्धी महामार्गामुळे नागपूर-मुंबईदरम्यानचा प्रवास १६ तासांवरून आठ तासांवर आला. 'मुंबई मेट्रो-३' हा मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक सेवेसाठी, अत्यंत आवश्यक असा परिवहन प्रकल्प ठरला आहे. कुलाबा-वांद्रे-सीप्झ हा ३३.५ किमीचा मार्ग पूर्णपणे भूमिगत असून, या मार्गामुळे दक्षिण मुंबईपासून अंधेरीपर्यंत प्रवासाचा वेळ ४५ मिनिटांवर आला आहे. १७ लाख प्रवासी दररोज मेट्रोतून प्रवास करतील, असा अंदाजही वर्तवण्यात आला आहे. आजपर्यंत लाखो मुंबईकर उपनगरी रेल्वेतून प्रवास करत होते. या उपनगरी सेवेवर वाढत्या लोकसंख्येचा ताण हा स्वाभाविकपणे पडत होता. त्यामुळेच प्रारंभी नऊ डब्यांची रेल्व १५ डब्यांची झाली, तरी तिच्यातील गर्दी काही कमी झाली नाही. मुंबईकरांच्या या प्राथमिक गरजेची निकड लक्षात घेतली ती फडणवीस सरकारनेच. त्यांनी मेट्रो प्रकल्पाला गती देत २०१६ साली आरेतील जागा हस्तांतरित करून, त्यासाठीचे काम वेगाने सुरू केले. मात्र, ठाकरे आणि कंपनीने 'आरे' प्रकरणात पर्यावरणाच्या नावाखाली अडथळे निर्माण केले. त्यानंतर, मुंबईच्या हिताच्या या प्रकल्पांना स्थगिती देण्यात आली. त्यानंतरच्या निवडणुकीत जनतेने मतांचे भरघोस दान, महायुतीच्या पदरात टाकले. त्यानंतर महायुती सरकारने रखडवलेले हे सर्व प्रकल्प वेगाने मार्गी लावले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा प्रकल्प महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेस नवी झेप देणारा ठरणार आहे. या विमानतळामुळे केवळ पर्यटन नव्हे, तर उत्पादन, सेवा आणि निर्यात क्षेत्रांनाही बळ मिळेल. अंदाजे पाच लाख रोजगारांची निर्मिती होईल. विमानतळाचा पहिला टप्पा पूर्ण झाल्यावर दरवर्षी दोन कोटी प्रवाशांची क्षमता वाढेल आणि भारतातील 'स्मार्ट एअर हब' म्हणून, नवी मुंबईचे नाव जागतिक नकाशावर झळकणार आहे. या विमानतळामुळे पुणे-मुंबई महानगर प्रदेशात नव्या औद्योगिक कॉरिडोरचा विकास वेगाने होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हवाई प्रवास सामान्य नागरिकांसाठी सुलभ करण्याचा 'उडान' हा संकल्प प्रत्यक्षात उतरवला आहे. नवी मुंबई विमानतळ हे त्याच दृष्टिकोनाचे पुढचे पाऊल ठरेल. मुंबईसाठी फडणवीस सरकारने जे प्रकल्प प्रत्यक्षात आणले, त्याचा उल्लेख यानिमित्ताने करावाच लागेल. यात अटल सेतूचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. २०१४ सालानंतर फडणवीस सरकारने अटल सेतूला वास्तवात आणले. १३ हजार, ५०० कोटींची गुंतवणूक आणि पर्यावरणीय मंजुरींसाठी केंद्र-राज्य सहकार्य या प्रकल्पाचे आधारस्तंभ ठरले. मुंबई कोस्टल रोड प्रकल्पाने शहराच्या पश्चिम किनाऱ्यावर वेगवान आणि पर्यावरणस्नेही प्रवासाची नवी दिशा निश्चित केली. आज हा मार्ग शहरातील वाहतूक ताण कमी करणारा ठरला आहे. ७६ हजार, २०० कोटींचा वाढवण बंदर प्रकल्प 'सागरमाला' योजनेतून उभा राहत असून, हे भारतातील सर्वांत आधुनिक बंदर ठरणार आहे. शतकभर जुने जीवनमान बदलणारा बीडीडी चाळ पुनर्विकास हा उपक्रम. फडणवीस सरकारने २०१६ साली पुनर्विकासाचा निर्णय घेतला आणि २०२५ साली पहिल्या टप्प्यातील ५५६ सदनिकांचे वितरणही पूर्ण केले.या पुनर्वसनामुळे सामान्य मुंबईकरांचे जीवनमान उंचावले आहे. नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग हा महाराष्ट्राचा 'ड्रीम कॉरिडोर' ठरला आहे. यामुळे विदर्भ-मराठवाडा-ठाणे-मुंबई हे आता आर्थिकदृष्ट्या एका महामार्गाने जोडले गेले आहे. मुंबईकर म्हणून ओळख मिळवणाऱ्या ठाकरे आणि कंपनीने, विकासाच्या नावाखाली नेहमीच स्वार्थाचे राजकारण केले. ठाकरे आणि कंपनीच्या कार्यकाळात मुंबईची अक्षरशः बजबजपुरी झाली. विरोधाला विरोध हेच धोरण कायम ठेवत, त्यांनी मुंबईकरांच्या हितासाठी हाती घेण्यात आलेले प्रकल्प मात्र स्वार्थासाठी रोखले. केंद्राशी संघर्ष करत मुंबईचा विकास थांबवण्याचे काम, महाभकास आघाडी'च्या काळात झाले. पर्यावरणाच्या नावाखाली विकास रोखला गेला, कामगार वर्ग आणि मध्यमवर्गीय मुंबईकर यांच्या समस्या कायम राहिल्या. काँग्रेसने १५ वर्षांत एकच सागरी सेतू उभारला, तर फडणवीस सरकारने काही वर्षांत मुंबईचा संपूर्ण पायाभूत चेहरामोहराच बदलून टाकला. मेट्रो, विमानतळ आणि बंदर प्रकल्पांमुळे मुंबईतील सेवा, लॉजिस्टिक्स, बांधकाम आणि पर्यटन क्षेत्रांमध्ये लाखो रोजगार निर्माण झाले आहेत. मुंबई मेट्रोच्या बांधकामात थेट ५० हजार आणि अप्रत्यक्ष १.५ लाख रोजगारांची निर्मिती झाली आहे. वाढवण बंदरामुळे कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात औद्योगिक गुंतवणुकीच्या नवनवीन संधी उपलब्ध होणार आहेत. महायुती सरकार केवळ विकासाच्या गप्पा मारत नाही, तर प्रत्यक्ष कामांद्वारे शहरात परिवर्तन घडवून आणत आहे. महायुती सरकारने मुंबईला आत्मविश्वास दिला आहे की, भारताची आर्थिक राजधानी आता जगातील सर्वोत्तम शहरांमध्ये स्थान मिळवू शकते.

# 'कृत्रिम बुद्धिमत्ता' आणि 'कृषी क्षेत्र' नव्या परिवर्तनाच्या दिशेने : मुख्यमंत्री फडणवीस

## 'एचपी ड्रीम्स अनलॉक्ड' उत्सवाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** आजचा काळ हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समाजात साक्षरता आणि समता निर्माण होऊ शकते. तंत्रज्ञान, डिजिटायझेशन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या साधनांना भौगोलिक सीमा नाहीत त्यामुळे श्रीमंत-गरीब, जाती, भाषा असा फरक करत नाही. म्हणूनच हे तंत्रज्ञान प्रत्येक भारतीयांच्या कल्पनांना आकार देऊ शकते, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. एचपी आणि इंटेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'एचपी ड्रीम अनलॉक्ड' या उत्सवाचे मेहबुब स्टुडिओ, वांद्रे येथे उद्घाटन करण्यात आले, त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.



कार्यक्रमाला एचपी इंडिया च्या व्यवस्थापकीय संचालिका इप्सिता दासगुप्ता, मुख्यमंत्र्यांचे सल्लागार कौस्तुभ धवसे, विपणन प्रमुख आकाश भाटिया, कायदेशीर व शासकीय व्यवहार विभाग प्रमुख राजू नायर तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शासनाने आता एआय स्वीकारण्याचे धोरण सुरू केले आहे. हे तंत्रज्ञान सर्वांसाठी खुले असून यात प्रत्येक जण आपल्या कल्पनांना वास्तवात आणू शकणार आहे. शासनाने एचपी सोबत डिजिटल मीडिया सेंटर ऑफ एक्सलन्स उभारले असून आता आणखी पुढे जाऊन सर्वसामान्यांना नव्या तंत्रज्ञानांचा, विशेषतः एआयचा, सहज प्रवेश मिळावा यासाठी भागीदारीचा आराखडा तयार करण्याचे ठरवले आहे. कृषी क्षेत्रातही एआयचा वापर सुरू केला आहे. पुण्यात झालेल्या ॲग्री-हॅकथॉनमध्ये तरुणांनी तयार केलेले एआय मॉडेल हे हवेतील घटकांचे विश्लेषण करून पिकावर होणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव आणि सर्तक करते. हे खरोखरच गेम-चेंजर मॉडेल असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी नमूद केले की, अशा तांत्रिक हस्तक्षेपांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान टळेल, खर्च कमी होईल आणि कृषीक्षेत्रात अधिक नफा मिळेल. एआय, ब्लॉकचेन आणि डिजिटायझेशन या तंत्रज्ञानांनी केवळ उद्योगच नव्हे तर शासन प्रणालीतही पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढवली असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात देशभरातील जवळपास ४० हजार तरुणांनी सहभाग घेतला असून त्यापैकी ४० सर्वोत्तम नवीन कल्पक उपक्रमांचा सन्मान करण्यात आला. हे ४० नवीन उपक्रम समाजात आणि अर्थव्यवस्थेत प्रत्यक्ष परिणाम करू शकतील या उपक्रमांच्या माध्यमातून नागरीकांचे जीवनमान उंचवण्यासाठी शासन भागीदारी करण्यास तयार असल्याचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले.

पान एक वरून..

### तालिबान मंत्र्यांच्या पत्रकार

प्रियांका गांधी यांच्यासह, तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोइत्रा यांनीही या घटनेवर टीका केली आहे. एक व्हिडिओ प्रसिद्ध करत महुआ मोइत्रा म्हणाल्या की, ''सरकारने महिला पत्रकारांना वगळून तालिबानच्या परराष्ट्रमंर्त्याना भारतात पत्रकार परिषद घेण्याची परवानगी कशी दिली? एस. जयशंकर यांच्यासारख्या परराष्ट्रमंर्त्यानी हे मान्य केले, हे कसे शक्य आहे? त्यांनी अशा अटी स्वीकारण्याची हिंमत कशी केली? तथाकथित पुरुष पत्रकार गप्प का राहिले?''या घटनेवर संताप व्यक्त करत माजी केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर लिहिले की, ''तालिबानचे परराष्ट्रमंत्री अम ीर खान मुत्ताकी यांच्या पत्रकार परिषदेतून महिला पत्रकारांना वगळण्यात आल्याचे ऐकून मला धक्का बसला. माझे वैयक्तिक मत असे आहे की, जेव्हा पुरुष पत्रकारांना महिला पत्रकारांचा समावेश नसल्याचे कळले, तेव्हा त्यांनी पत्रकार परिषदेवर बहिष्कार टाकायला हवा होता.''

### उद्धव ठाकरेंचा हंबरडा मोर्चा

तुम्हाला राजकारण करण्यासाठी शेतकऱ्यांची मतं हवी आहेत. शेतकऱ्यांच्या मतावर तुम्ही सरकार आणता. शेतकऱ्यांच्या मतावर तुम्ही राजकारण करतात. मग शेतकऱ्यांनी न्याय हक्क मागितला तर तुम्ही म्हणतात त्याचे राजकारण नाही. हे कुठलं सरकार आहे? कर्जाचे पुनर्गठन करणार असे सांगितले. आम्हाला हे पुनर्गठण नको आहे. आजचं मरण उद्यावर नको. आम्हाला कर्जमुक्ती पाहिजे आहे. मुख्यमंत्री बोललेत की, यांना अधिकार काय? परंतु मला अधिकार आहे. कारण मी मुख्यमंत्री असताना कर्जमुक्त करून दाखवलं होतं. सरकारला आम्ही इशारा देत आहोत जर तुम्ही कर्जमुक्त केली नाही तर आम्ही फक्त मराठवाडा नाही तर आम्ही संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी रस्त्यावर उतरवून तुमचा विरोध केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा देखील उद्धव ठाकरेंनी दिला. तर कर्जमुक्ती पाहिजे म्हणजे पाहिजे, अशी मागणी देखील त्यांनी यावेळी केली.

### घराचा उंबरठा न ओलांडणारे

डोळ्यातले अश्रू आम्ही पाहिले आणि त्यावेळेस आम्ही ठरवलं की शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ राहायचं. म्हणून आम्ही एनडीआरएफचे निकष असतील, अटीशर्ती असतील त्या सर्व बाजूला ठेऊन मोठ्या प्रमाणात भरीव देण्याचं ठरवलं. शेतकऱ्यांच्या डोळ्यातले अश्रू पुसण्याचं काम आम्ही केलं याच मला समाधान आहे.आम्ही ३२ हजार कोटींचं पॅकेज जाहीर केलं, आम्ही म्हणालो होतो की, शेतकऱ्यांची दिवाळी आम्ही काळी होऊन देणार नाही, दिवाळी पूर्वी त्यांच्या खात्यात पैसे जमा होऊ लागले आहेत. आम्ही ४७ हजार हेक्टरी मदत केली, जमीन खरडून गेलेल्या लोकांना पुन्हा मनरेगाच्या माध्यमातून ३ लाख रुपये हेक्टरी असे ३ लाख ४७ हजार रुपये मदत केली. आतापर्यंतच्या इतिहासात इतकी मदत शेतकऱ्याला कधीच मिळाली नव्हती.शेतकऱ्यांची चिंता आम्ही मिटवली. हे करत आहेत ते निव्वळ राजकारण आहे. तुम्ही शेतकऱ्यांच्या बांधावर जाताना शेतकऱ्याच्या पोराच्या डोळ्यातले अश्रू पाहून त्याच्या हातात बिस्कीटचा पुडा तरी ठेवला का? आम्ही मोठं मोठे किट पाठवले, त्यांचा दसरा चांगला झाला, दिवाळी ही त्यांची चांगली होईल हे आम्ही पाहिलं. हा कसला हंबरडा मोर्चा? हे उंबरठा न ओलांडणारे आता हंबरडा फोडायला लागलेत. सत्ता गेली तेव्हा हंबरडा फोडला, खुर्ची गेली तेव्हा हंबरडा फोडला. हे पुतणा-मावशीचं प्रेम आहे, हे निव्वळ शेतकऱ्यांच्या नावावर केलेले राजकारण आहे.

### पंतप्रधान मोदींकडून शेतकऱ्यांना

काश्मीरमधील कृत्रिम रेतन प्रशिक्षण केंद्रे, अमरेली आणि बनासमधील उत्कृष्टता केंद्रे, राष्ट्रीय गोकुळ मिशन अंतर्गत आसाममध्ये आयव्हीएफ प्रयोगशाळा, मेहसाणा, इंदूर आणि भिलवाडा येथे दूध पावडर प्लांट आणि प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत तेजपूरमध्ये माशांच्या खाद्य प्लांटचा समावेश आहे.

पंतप्रधान मोदींनी राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान, मैत्री तंत्रज्ञ आणि प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था अंतर्गत प्रमाणित झालेल्या शेतकऱ्यांना प्रमाणपत्रे प्रदान केली, ज्यांचे रूपांतर प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्रे आणि सामान्य सेवा केंद्रे मध्ये झाले. या कार्यक्रमात सरकारी उपक्रमांतर्गत झालेल्या महत्त्वपूर्ण कामगिरीचे दर्शन घडले, ज्यात १०००० शेतकरी उत्पादक संघटना मध्ये ५० लाख शेतकरी सदस्यता समाविष्ट आहेत. कृषी, पशुसंवर्धन आणि मत्स्यपालनात मूल्य साखळी स्थापित करण्यासाठी विविध सरकारी योजनांचा लाभ घेतलेल्या डाळी उत्पादक शेतकऱ्यांशीही पंतप्रधान मोदींनी संवाद साधला. या कार्यक्रमात कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह आणि कृषी राज्यमंत्री भागीरथ चौधरी उपस्थित होते.

### एक जुलैनंतर नोंदणी केलेल्यांना मतदानाचा हक्क नाही, का घेतला प्रशासनाने निर्णय?

पुणे : महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाकडून दिली जाणारी म तदारयादी वापरली जाणार आहे. १ जुलै २०२५ रोजी अंतिम करण्यात आलेली ही यादी ग्राह्य धरली जाणार असून, त्यानंतर नावनोंदणी केलेल्या मतदारांना महापालिका निवडणुकीत मतदानाच्या हक्कापासून वंचित राहावे लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. आयोगाच्या यादीनुसार शहरातील ३५ लाख मतदारांना मतदानाची संधी मि ळणार आहे.

'महापालिकेच्या यापूर्वीच्या निवडणुकीत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मतदारांची यादी घेऊन प्रभागनिहाय, मतदान केंद्रनिहाय या यादीची फोड केली जात होती. मात्र, या वेळी स्थानिक पातळीवरून मतदारयादी घेऊ नये, निवडणुकीसाठी केवळ आयोगाकडून देण्यात आलेली मतदारयादी ग्राह्य धरावी, असे आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. त्यामुळे या निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाकडून यादी घेतली जाणार नाही.

# वारकऱ्यांची शपथ शेतकऱ्यांच्या जिवाला धीर देणारी बीडची दिंडी!

## तुकारामाच्या नामात आशेचा दीप शेतकऱ्यांसाठी वारकऱ्यांचा संकल्प

**दैनिक आपला विदर्भ**

**बीड/प्रतिनिधी :** ''शेतकऱ्याचा घाम वाया जाऊ नये, त्याच्या ओंजळीत पुन्हा हसू यावं'' या भावनेने आज बीड शहरात एक विलक्षण अध्यात्मिक चळवळ उभी राहिली. ज्ञानोबा-तुकोबा आधार दिंडीच्या माध्यमातून वारकरी साहित्य परिषदेने शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी घेतलेला हा उपक्रम आज हजारो वारकऱ्यांच्या सहभागाने आशेचा उत्सव ठरला.






छत्रपती शिवाजी महाराज चौकातून निघालेली दिंडी टाळ-मृदुंगाच्या गजरात, नामघोषांच्या निनादात, ''शेतकरी जगला पाहिजे'' या भावनेने मार्गक्रमण करत सामाजिक न्याय चौकात पोहोचली. तिथे वारकऱ्यांनी आकाशाकडे हात करून घेतली सामूहिक शपथ ''आम्ही आत्महत्या थांबवू, शेतकऱ्यांच्या मनात धीर जागवू!'' शेतकऱ्याच्या आयुष्यात प्रकाश आणू'' ह. भ. प. विठ्ठल पाटील

दिंडीच्या समारोपावेळी प्रमुख प्रवचनकार ह. भ. प. विठ्ठल पाटील यांनी भावनिक शब्दांत सांगितले शेतकऱ्याच्या हातात देव आहे, कारण तोच अन्नदाता आहे. जर त्याचाच धीर खचला, तर आपलं अस्तित्व निरर्थक ठरेल. म्हणूनआम्हीवारकरीम्हणूनसंकल्पघेतो प्रत्येक शेतकऱ्याच्या मनात पुन्हा श्रद्धा आणि आशा निर्माण करू.''

त्यांचे शब्द ऐकून अनेकांच्या डोळ्यांत अश्रू आले. वारकऱ्यांनी टाळ-मृदुंगासह तुकारामांची ओवी गात शेतकऱ्यांसाठी प्रार्थना केली ''देवा, आमच्या शेतकऱ्याच्या जीवाला धीर दे.''

स ं त वि चा रां तू न जागृती, निराशेवर मात अतिवृष्टी, दुष्काळ, कर्ज आणि बाजारभावांच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना मानसिक आधार देण्याचा हा उपक्रम म्हणजे वारकऱ्यांच्या भक्तीचा सामाजिक विस्तार आहे. संत तुकाराम आणि ज्ञानेश्वरांच्या विचारांमधून धैर्य, श्रद्धा आणि आशा हे तीन दिवे पेटवण्याचा प्रयत्न बीड जिल्ह्यात सुरू झाला आहे.

आयोजक मंडळाच्या वतीने सांगण्यात आले ही दिंडी फक्त श्रद्धेची नव्हे, तर शेतकऱ्यांच्या आयुष्याला नवा अर्थ देणारी आहे. संतविचारांतूनच या समाजाला नवसंजीवनी मिळणार आहे.''

आज बीडच्या रस्त्यांवर पसरलेला वारकऱ्यांचा नाद हा केवळ भक्तीचा नव्हता, तो होता शेतकऱ्यांच्या जगण्याचा आवाज. तुकारामाच्या ओवीतून, ज्ञानोबांच्या नामातून उमटला तो एकच संदेश ''आत्महत्या नाही, आता नवजीवन!''

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# कोल्हापुरात खंडित गॅस पुरवठ्याच्या निषेधार्थ नागरिकांचा रास्ता रोको

## ऐन दिवाळीच्या तोडांवर नागरिकांचा संताप; आमदार राजेश क्षीरसागर यांच्या हस्तक्षेपानंतर गॅस पुरवठा सुरळीत

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी:** ऐन दिवाळीच्या तोडांवर कोल्हापुरात खंडित गॅस पुरवठ्यामुळे नागरिकांचा संताप उसळला. कोल्हापूर शहरातील संभाजीनगर परिसरात गेल्या काही दिवसांपासून संदीप गॅस एजन्सीमार्फत होणारा गॅस पुरवठा पूर्णपणे ठप्प झाल्याने नागरिकांना स्वयंपाकाच्या इंधनासाठी त्रास सहन करावा लागत होता. अखेर आज महिलांनी आणि स्थानिक नागरिकांनी रस्त्यावर गॅस टाक्या ठेवत जोरदार रास्ता रोको आंदोलन केलं.






''दिवाळी जवळ आली, घरात दिवे लावायचे, पण चुल पेटत नाही...,'' अशा भावना व्यक्त करत महिलांनी संतप्त घोषणाबाजी केली. यामुळे परिसरात वाहतुकीचा मोठा अडथळा निर्माण झाला.

आमदार क्षीरसागरांचा तातडीचा हस्तक्षेप.दरम्यान, याच मार्गावरून कागल दौऱ्यासाठी निघालेले आमदार राजेश क्षीरसागर यांनी आपला ताफा थांबवत आंदोलनकर्त्यांची भेट घेतली. नागरिकांनी त्यांच्यासमोर आपली व्यथा मांडत तीव्र भावना व्यक्त केल्या दिवाळीत गॅस नाही, मुलं उपाशी आहेत; किती वेळा एजन्सीकडे फिरायचं?''

स्थितीचे गांभीर्य ओळखून आमदार क्षीरसागर यांनी तत्काळ जिल्हाधिकारी अमोल येडगे, जिल्हा पुरवठा अधिकारी मोहिनी चव्हाण, तसेच एचपी गॅसचे सेल्स मॅनेजर यांच्याशी फोनवर संपर्क साधला. त्यांनी अधिकाऱ्यांना तातडीने कारवाई करून गॅस पुरवठा पुन्हा सुरू करण्याचे आदेश दिले.

अर्ध्यातासातचगॅसपुरवठासुरळीत आमदारांच्या हस्तक्षेपानंतर प्रशासन आणि एजन्सीने त्वरित हालचाल केली. अवघ्या अर्ध्या तासात संभाजीनगर परिसरातील गॅस पुरवठा सुरळीत झाला. त्यामुळे नागरिकांनी दिलासा व्यक्त करत आमदार क्षीरसागर यांचे आभार मानले.

नागरिकांचा दिलासा, पण प्रश्न कायम... गॅस पुरवठा सुरू झाल्याने तत्काळ परिस्थिती नियंत्रणात आली असली, तरी नागरिकांनी प्रशासनाला इशारा दिला

दिवाळीच्या काळात पुन्हा अशी वेळ आली, तर आम्ही शांत बसणार नाही.''

संभाजीनगर परिसरातील नागरिकांच्या या आंदोलनाने कोल्हापूर जिल्हा प्रशासनाला पुरवठा व्यवस्थेतील त्रुटींचा पुनर्विचार करण्याची गरज अधोरेखित केली आहे.

# दोन बायका अन् फजिती ऐका! युट्यूबर अरमान मलिकनं घेतलेल्या निर्णयाने चाहतेही आश्चर्यचकित

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतातील प्रसिद्ध युट्यूबर अरमान मलिक हा अनेकदा वादात अडकला आहे, परंतु यावेळी हे प्रकरण थोडे गंभीर आहे. अरमान मलिक सध्या कायदेशीर वादात अडकला आहे. अलीकडेच त्याच्याविरुद्ध एक खटला दाखल करण्यात आला होता, ज्यामध्ये अरमान मलिकने तीन लग्न केल्याचा आरोप करण्यात आला होता, जो हिंदू धर्माविरुद्ध आहे आणि खोटा संदेश पसरवत आहे. या प्रकरणानंतर, अफवा पसरू लागल्या की अरमान मलिकला त्याच्या एका पत्नीला घटस्फोट देण्यास भाग पाडले जाऊ शकते.

घटस्फोट टाळण्यासाठी अरमान मलिकने हे पाऊल उचलले

घटस्फोटाच्या अफवांमध्ये, अरमान मलिक अलीकडेच त्याची दुसरी पत्नी कृतिका मलिकसह दुबईला गेला. तिथे, अरमानने खुलासा केला की त्याने दुबईमध्ये प्रॉपर्टीचा व्यवसाय सुरू केला आहे. पायल आणि कृतिका संयुक्तपणे हा व्यवसाय सांभाळतील. पण सर्वात धक्कादायक गोष्ट म्हणजे अरमानने सांगितले की तो लवकरच त्याच्या संपूर्ण कुटुंबासह दुबईला स्थलांतरित होईल. या निर्णयामुळे युट्यूबरचे चाहते खूप आश्चर्यचकित झाले आहेत.

अरमान मलिकने दुबईला जाण्यामागील कारणही सांगितले. तो म्हणाला की दुबईमध्ये दोन बायका एकत्र असणे कायदेशीर आहे. याचा अर्थ असा की त्याला तेथे कोणत्याही कायदेशीर अडचणींना तोंड द्यावे लागणार नाही. कृतिका देखील त्याच्या निर्णयाशी पूर्णपणे सहमत आहे.

अरमान मलिक पत्नींपासून वेगळा होणार नाही

अरमान मलिकच्या निर्णयावरून असे सूचित होते की जर त्याला त्याच्या पत्नींना घटस्फोट देण्यास भाग पाडले गेले तर तो कायमचा दुबईला जाईल, परंतु त्यापैकी कोणालाही घटस्फोट देणार नाही. तथापि, घटस्फोटाच्या वृत्तांबाबत अरमान आणि त्याच्या दोन्ही पत्नी, कृतिका मलिक आणि पायल मलिक यांनी अद्याप कोणतेही अधिकृत विधान केलेले नाही.

# शेतकऱ्यांच्या न्यायहक्कासाठी शिवसेनेचे रास्तारोको आंदोलन

महायुती सरकारच्या निष्क्रिय भूमिकेविरोधात आणि शेतकऱ्यांच्या न्याय मागण्यांसाठी आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने मानोरा चौक, येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात पक्षाचे पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना तसेच असंख्य शिवसैनिकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. आंदोलनादरम्यान शासनविरोधी घोषणांनी परिसर दणाणून गेला.प्रमुख मागण्या, राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा.अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून तातडीने ओला दुष्काळ घोषित करण्याची मागणी करण्यात आली.

शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी कर्जबाजारी शेतकरी आत्महत्यांच्या उंबरठ्यावर आहेत, त्यामुळे पूर्ण कर्जमाफी हाच पर्याय असल्याचे वक्त्यांनी सांगितले.

हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान द्यावे शेतीतील नुकसान भरपाई म्हणून तातडीने हेक्टरी ५० हजार रुपये देण्याची मागणी शिवसेनेकडून करण्यात आली.




या आंदोलनावेळी शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी सांगितले, ''महायुती सरकार शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेत नाही. आम्ही शांत बसणार नाही. सरकारने तातडीने निर्णय घेतला नाही, तर शिवसेना आणखी तीव्र आंदोलन छेडेल.'' महिला आघाडी आणि युवासेना कार्यकर्त्यांनीही घोषणाबाजी करत आंदोलनाला जोम दिला. काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. पोलिसांनी मध्यस्थी करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

# किनगांव राजा : अमरावती विभागस्तरीय कुस्ती स्पर्धेत विजयी खेळाडू व उपस्थित क्रीडा शिक्षक

## कामक्षा देवी महाविद्यालयाचा शुभम शिरसाठ कुस्ती स्पर्धेत राज्यस्तरावर



**किनगांव राजा /प्रतिनिधी :** कामक्षा देवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय किनगांव राजा शाळेतील विद्यार्थी शुभम रवींद्र शिरसाठ यांनी जिल्हा क्रीडा संकुल अमरावती ता.१० ऑक्टोबर रोजी झालेल्या १९ वर्ष वयोगटामध्ये ६१ किलो वजन गटामध्ये कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक येऊन राज्य स्तरावर होणाऱ्या कुस्ती स्पर्धेसाठी पात्र ठरले आहे.महाराष्ट्र राज्य क्रीडा संचालनय पुणे यांच्यामार्फत विभागीय कुस्ती स्पर्धात अमरावती क्रीडा येथे आयोजित करण्यात आली होती.शाळेतील इयत्ता १२ वी चा विद्यार्थी शुभम रवींद्र शिरसाठ १९ वर्ष वयोगट ६१ किलो वजन गटामध्ये प्रथम आल्यामुळे अमरावती प्रतिनिधित्व करणार आहे. अमरावती विभागीय स्तरावर प्रथम आलेल्या कुस्ती स्पर्धेमध्ये विजयी विद्यार्थ्यांचे स्वागत व अभिनंदन शाळेचे अध्यक्ष शिवाजीराव काळुसे यांनी केले आहे.यावेळी प्राचार्य उद्धव दराडे,सहाय्यक शिक्षक रामदास सानप, प्रकाश सोनुने, संजय केकान,गजानन मुंढे,राजीव मांटे, नितीन खरात, गजानन थीगळे, संजय काळुसे,उद्धव राठोड, धम्मपाल गवई, गोपाल पवार, गणेश काळुसे,रामेश्वर हरकळ, गजानन काळुसे,दत्तू दांडगे,राजु चंदवडे,सत्यम जगदाळे, उद्धव हरणे यांच्यासह क्रीडा शिक्षक आदीजण उपस्थित होते.

## श्रीराम पांडव यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीराम पांडुरंग पांडव यांचे वृद्धापकाळाने दि. ११/१०/२०२५ रोजी निधन झाले. ते त्यांच्या कुटुंबीय व नातेवाईकांमध्ये खूप आदरणीय होते. त्यांच्या अंत्यसंस्काराची विधी सायंकाळी ६:०० वाजता कांचन गंगा स्मशानभूमी, डोणगाव येथे संपन्न झाली. या विधीत नातेवाईक, मित्रपरिवार आणि स्थानिक नागरिक उपस्थित राहून त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, अशी प्रार्थना केली. निंबाजी श्रीराम पांडव माधव श्रीराम पांडव कुटुंबीय व मित्रपरिवार यांनी त्यांच्या निधनाची दु:खद बातमी स्थानिक समाजास कळवली असून, कै. श्रीराम पांडव यांना श्रद्धांजली अर्पण केली.



# दिग्रसच्या खेळाडूंचा सीबीएससी राष्ट्रीय ज्यूडो स्पर्धेत एक सुवर्ण, तीन कांस्यपदकावर कब्जा; यवतमाळ जिल्ह्याला प्रथमच उपविजेतेपद

दैनिक आपला विदर्भ

**दिग्रस/प्रतिनिधी :** दिग्रस येथील सात खेळाडूंनी सीबीएससी राष्ट्रीय ज्यूडो स्पर्धेत एक सुवर्ण, तीन कांस्यपदकांवर कब्जा केल्याने त्यांचेवर कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. उपरोक्त सर्वजण डॉ. कानो ज्यूडो क्लबचे खेळाडू असून त्यांच्यामुळे यवतमाळ जिल्ह्याला प्रथमच उपविजेतेपद प्राप्त झाले आहे.

राजस्थानच्या गंगानगर येथे राष्ट्रीय ज्यूडो स्पर्धा नुकतेच पार पडली. दिग्रस येथील वेदांत पारधीने ३५ किलो वजन गटात भारतातील सर्व खेळाडूवर मात करीत सुवर्णपदक प्राप्त केले. सदर स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळवणारा तो दिग्रस तसेच यवतमाळ जिल्ह्यातील पहिला खेळाडू ठरला आह, हे येथे विशेष !

दिग्रस येथीलच उकाश फरहान शेख याने ४० किलो वजनगटात तसेच अर्श रियाज बाळापुरेने ५० किलो वजनगटात कांस्यपदक प्राप्त केले तर मुलींमध्ये कु.अनन्या रेगुलवारने १४ वर्षाखालील ३६ किलो वजनगटात कास्यपदक प्राप्त करून शहराला लौकिक मिळवून दिले आहे. कु. रिया डीके, अफ्फान वर्षानी, यश हळदे यांनी देखील आपापल्या वजन गटात उत्कृष्ट प्रदर्शन केले.

आंतरराष्ट्रीय ज्यूडो स्पर्धेत दोन सुवर्णपदक विजेते व शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त प्रा. डॉ. रविभूषण माणिकराव कदमद्वारा गुरुदेवनगर येथील महात्मा ज्योतिबा फुले हॉलमध्ये मागील अनेक वर्षांपासून निशुल्क चालविण्यात येणाऱ्या केंद्रामध्ये सर्व विजयी खेळाडू नियमित सराव करत असतात. सर्वांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील आणि ज्यूडो प्रशिक्षक प्रा डॉ. रविभूषण माणिकराव कदम यांना दिले आहे.

दिग्रससारख्या लहानशा गावाला व यवतमाळ जिल्ह्याला राष्ट्रीय पातळीवर



लौकिक मिळवून दिल्याबद्दल तसेच उप विजेतापद जिंकून दिल्याबद्दल सर्व पालकांनी आणि ज्यूडो प्रेमींनी सर्व विजयी खेळाडूंचे व प्रशिक्षकांचे कौतुक आणि अभिनंदन केले असून येणाऱ्या सर्व स्पर्धासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## संक्षिप्त...

### ठाकरे ब्रँडवर शंभूराज देसाईंचा टोला; बाळासाहेब ठाकरे हाच खरा ब्रँड होता, आहे आणि राहील



दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी :** ''आत्तापर्यंत ठाकरे ब्रँड नव्हता का?'' असा थेट सवाल करत राज्याचे मंत्री शंभूराज देसाई यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. ''महाराष्ट्रात ठाकरे ब्रँड एकच आहे वंदनीय बाळासाहेब ठाकरे. तो ब्रँड काल होता, आज आहे आणि उद्याही राहील,'' असे ते म्हणाले.

दरम्यान, देसाई यांनी हंबरडा मोर्चावरून ठाकरे गटावर निशाणा साधला. ''उद्धव ठाकरे यांच्या काळात शेतकऱ्यांना जितकी मदत मिळाली, त्यापेक्षा जास्त मदत आमच्या सरकारने दिली आहे. त्यामुळे आता ते केवळ सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. जनतेवर त्याचा काही परिणाम होणार नाही,'' असा टोला त्यांनी लगावला.

साताऱ्यातील कराड आणि पाटण तालुक्यांतील अतिवृष्टीबाबत ते म्हणाले, ''सलग चार ते पाच महिन्यांपासून पडणाऱ्या पावसामुळे ७० टक्के पेरण्या झाल्या नाहीत. ज्या ठिकाणी पेरणी झाली, तिथे उत्पादन अत्यल्प आहे. प्रत्यक्ष पाहणी केली जाणार असून, कोणताही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही.'' शंभूराज देसाई, मंत्री ''बाळासाहेब ठाकरे हा एकच ब्रँड आहे; आमच्या सरकारने शेतकऱ्यांसाठी सर्वाधिक मदत केली आहे.''

### पाटील कॉलेजमध्ये पं दीनदयाळ उपाध्याय यांच्या हिरक महोत्सव निमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन




दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** येथील स्व पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एम एन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व ग्रंथालय विभागप्रमुख प्रा विजय आर गायकवाड यांच्या नियोजनाखाली संदर्भीय शासन परिपत्रक, संचालनालय व सहसंचालक कार्यालय अमरावतीचे पत्र अवलोकनार्थ एकात्म मानवदर्शन ह्या पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या हिरक महोत्सवी कार्यक्रमानिमित्त ग्रंथालय विभागातर्फे वृक्तत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत प्रथम क्रमांक बीएस्सी प्रथम वर्षाची विद्यार्थिनी कु कांचन शेषराव भुत्तेकर, द्वितीय क्रमांक बीएस्सी द्वितीय वर्षाची कु साक्षी परमेश्वर सरोदे व तृतीय क्रमांक बीएससी प्रथम वर्षाची कु भारती रविंद्र घुले या विद्यार्थिनींचा आला. यावेळी या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा डॉ प्रकाश हनवते व प्रा डॉ सिध्दार्थ इंगोले यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा विजय गायकवाड यांनी केले. या स्पर्धेला प्राध्यापक कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

### अमेरिका-चीन व्यापार युद्ध पुन्हा उफाळले; ट्रम्प यांनी चिनी आयातीवर 100 टक्के टॅरिफ लावण्याची केली घोषणा

वॉशिंग्टन : अमेरिका आणि चीनमधील व्यापार युद्ध पुन्हा सुरू झाले आहे. मात्र यावेळी याची सुरुवात चीनने केली आहे. चीनने दुर्मिळ पृथ्वी खनिजांच्या (रेअर अर्थ मिनरल्स) निर्यातीवर प्रतिबंध वाढवण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प संतापले आहेत. अशा स्थितीत डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी चीनविरोधात नवीन व्यापार उपाययोजना जाहीर केली आहे. त्यांनी १ नोव्हेंबरपासून सर्व चिनी आयातींवर १०० टक्के अतिरिक्त टॅरिफ लावण्याची आणि अमेरिका निर्मित महत्त्वाच्या सॉफ्टवेअरवर कठोर निर्यात नियंत्रण लावण्याची घोषणा केली आहे. हा निर्णय जगातील दोन सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांमधील तणाव वाढवू शकतो. सोशल मीडियावरील पोस्टमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यापाराच्या बाबतीत बीजिंगने अत्यंत आक्रमक भूमिका घेतल्याचा आरोप केला आणि इशारा दिला की, अमेरिका देखील त्याच पद्धतीनं प्रत्युत्तर देईल. ट्रम्प यांनी घोषणा करताना म्हटले, ''१ नोव्हेंबर २०२५ पासून किंवा त्याआधी, चीनच्या पुढील कृती किंवा बदलांवर अवलंबून, अमेरिका चीनवर १०० टक्के कर लादेल.''

# जिल्ह्यातील १३ तालुके आपत्तीग्रस्त घोषित

## ➤ अतिवृष्टी व पूर बाधितांना विशेष मदत पॅकेज, सवलती लागू !
## ➤ सुधारित शासन निर्णय जारी ➤ शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक योजनेत नोंदणी करण्याचे आवाहन



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाने जून ते सप्टेंबर या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे राज्यातील २८२ तालुके हे आपत्तीग्रस्त तालुके म्हणून घोषित केले आहेत. यात बुलढाणा जिल्ह्यातील चिखली, सिंदखेड राजा, देउळगाव राजा, लोणार, शेगाव, मोताळा, बुलढाणा, खामगाव, मेहकर, मलकापूर, जळगाव जामोद हे ११ तालुके पूर्णत: बाधित तर नांदुरा आणि संग्रामपुर हे २ अंशत: बाधित तालुके आपत्तीग्रस्त घोषित करण्यात आली आहेत.

या तालुक्यांमध्ये अतिवृष्टी व पुरामुळे बाधितांना अथवा आपदग्रस्तांना दुष्काळ सदृश्य परिस्थितीत लागू असणाऱ्या सवलती देण्यास शासन मान्यता देण्यात आली असल्याचा सुधारित शासन निर्णय राज्य शासनाने शुक्रवारी जारी केला आहे. यापूर्वी ९ ऑक्टोबर रोजी जारी करण्यात आलेला शासन निर्णय अधिक्रमित करण्यात आला आहे.

तसेच खरीप हंगामात अतिवृष्टी व पुरामुळे शेतीपिकाचे नुकसान, शेतजमीन खरडून जाणे, विहिरीचे नुकसान, मनुष्य व पशुहानी, घर पडझड, घरातील वस्तू/साहित्य नुकसान, वैयक्तिक तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. अशा अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे बाधितांना विशेष मदत पॅकेज देण्यासही शासनाने मान्यता दिली आहे.

या विशेष मदत पॅकेजअंतर्गत राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे मदतीचे दर व निकषानुसार विविध प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार आहे. यात आपातग्रस्त मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना देय आर्थिक सहाय्य बाबींतर्गत मृत व्यक्तींच्या वारसांना ४ लाख रुपये, अवयव अथवा डोळे निकामी झाल्यास देय आर्थिक सहाय्य बाबींतर्गत ४० ते ६०% अपंगत्व आल्यास ७४ हजार रुपये व ६०% पेक्षा अधिक अपंगत्व आल्यास २.५० लाख रुपये, जखमी व्यक्ती इस्पितळात दाखल झाला असल्यास एक आठवड्यापेक्षा अधिक कालावधी असल्यास १६ हजार रुपये व एक आठवड्यापेक्षा कमी कालावधी असल्यास ५,४०० रुपये इतकी मदत देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

घर आणि जनावरांसाठी आर्थिक आधार पूर्णतः नष्ट झालेल्या पक्क्या किंवा कच्च्या घरांसाठी या बाबींतर्गत सपाट भागातील घरांसाठी १ लाख २० हजार रुपये आणि डोंगराळ भागातील घरांसाठी १ लाख ३० हजार रुपये, अंशतः पडझड झालेल्या घरांसाठी (किमान १५%) या बाबींतर्गत पक्क्या घरांसाठी ६,५०० रुपये प्रति घर व कच्च्या घरांसाठी ४,००० रुपये प्रति घर, झोपडीसाठी ८००० रुपये प्रति झोपडी, गोठासाठी ३००० रुपये प्रति गोठा, मृत जनावर या बाबींतर्गत दुधाळ जनावरांसाठी ३७,५०० रुपये प्रति जनावर, ओढकाम करणाऱ्या जनावरांसाठी ३२,००० रुपये प्रति जनावर, लहान जनावरांसाठी २०,००० रुपये प्रति जनावर, शेळी किंवा मेंढींसाठी ४००० रुपये प्रति जनावर, कुक्कुटपालनांतर्गत १०० रुपये प्रति कोंबडी इतकी मदत देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

शेतीपिकांच्या नुकसान मदतीसाठी ३ हेक्टरची मर्यादा शेतीपिकांच्या नुकसानीसाठी या बाबींतर्गत ३ हेक्टरच्या मर्यादेत जिरायत पिकांसाठी ८,५०० रुपये प्रति हेक्टर, आश्वासित सिंचनाखालील (बागायत) पिकांसाठी १७,००० रुपये प्रति हेक्टर ३ हेक्टरच्या मर्यादेत, बहुवार्षिक पिकांसाठी २२,५०० रुपये प्रति हेक्टर ३ हेक्टरच्या मर्यादेत इतकी मदत देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**खरडून गेलेल्या शेतजमीनींसाठी ४७ हजार रुपये**

शेतजमीनीचे नुकसान या बाबींतर्गत नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतजमीनीवरील गाळ काढण्यासाठी १८,००० रुपये प्रति हेक्टर, दरड कोसळणे/जमीन खरडणे, खचणे व नदी पात्र किंवा प्रवाह बदलल्यामुळे शेत जमीन वाहून जाणे यासाठी केवळ अल्प व अत्यल्प भुधारक शेतकऱ्यांना ४७,००० रुपये प्रति हेक्टर इतकी मदत देण्यास मान्यता देण्यात आली आहे. यात २ हेक्टरपर्यंत एसडीआरएफ निधीतून व पुढील मदत राज्य निधीतून देण्यात येणार आहे.

**शेतजमीन लागवडी योग्य करण्यासाठी ५ लाख रुपयांपर्यंत मदत**

जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे शेतकऱ्यांच्या शेतजमिन खरडून जाऊन झालेल्या नुकसानीसाठी शासन निर्णय दि.२७ मार्च २०२३ च्या निकष व दरानुसार मदत व पुनर्वसन विभागाकडून मदत अनुज्ञेय राहील. या मदती व्यतिरिक्त रोजगार हमी योजना (मनरेगा) विभागामार्फत शेतकऱ्यांच्या शेतजमिनी लागवडी योग्य करण्यासाठी जास्तीत जास्त रु. ३ लाख प्रति हेक्टर या मर्यादेत व २ हेक्टर पर्यंत रु. ५ लाख अनुज्ञेय राहील.

**सिंचन विहिर दुरुस्तीसाठी ३० हजार**

अतिवृष्टी व पुरामुळे खचलेल्या व बुजलेल्या सिंचन विहिरी दुरुस्तीच्या कामासाठी प्रत्यक्ष खर्चास किंवा प्रति विहिर कमाल मर्यादा रु. ३० हजार यापैकी जी रक्कम कमी असेल ती लाभार्थ्यास अनुज्ञेय राहील.

**मत्स्य व्यवसायिकांना मदत**

मत्स्य व्यवसाय बाबींतर्गत मत्स्य व्यवसायिकांना बोटींची दुरुस्ती, जाळी यासाठी मदत करण्यात येणार असून बोटींची अंशतः दुरुस्ती ६००० रुपये, पुर्णतः नष्ट झालेल्या बोटीकरिता १५,००० रुपये, अंशतः बाधित झालेल्या जाळ्यांच्या दुरस्तीसाठी ३००० रुपये, पुर्णतः नष्ट झालेल्या जाळ्यांसाठी ४००० रुपये इतकी मदत देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**'या' सवलती लागू**

अतिवृष्टी व पुर आपत्तीमुळे बाधित तालुक्यामध्ये बाधितांना अथवा आपदग्रस्तांना सवलती लागू करण्यात आल्या असून त्यानुसार जमीन महसूलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती (एक वर्षासाठी), तिमाही वीज बिलात माफी, परीक्षा शुल्कात माफी व १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांची फी माफी या सवलती लागू करण्यात आल्या आहेत.

**ई-केवायसीतून सूट**

ज्या शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅकमध्ये नोंदणी होऊन ॲग्रीस्टॅकमध्ये ई-केवायसी झाली आहे अश्या शेतकऱ्यांची माहिती डीबीटी प्रणालीवर भरलेल्या माहितीशी जुळत असलेल्यांना मदत मिळणे सुलभ व सुकर होण्यासाठी डीबीटीद्वारे मदत वितरणासाठीच्या आवश्यक ई-केवायसी प्रक्रियेपासून सूट देण्यात आली आहे. या मदतीसाठी शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक योजनेंतर्गत फार्मर आयडीसाठी नोंदणी आवश्यक राहणार आहे. ज्या शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅकमध्ये नोंदणी नाही त्यांना प्रचलित पद्धतीने ईकेवायसी केल्यावर मदत वितरित करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅकअंतर्गत फार्मर आयडीसाठी लवकरात लवकर नोंदणी करुन ईकेवायसी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

**रब्बी हंगामात खते व बियाणे खरेदीसाठी प्रति हेक्टरी १० हजार रुपये**

ज्या शेतकऱ्यांना अतिवृष्टी/पूर इत्यांदींमुळे राष्ट्रीय नैसर्गिक आपत्ती प्राधिकरणाच्या नियमानुसार नुकसान भरपाई देय ठरते अशा शेतकऱ्यांना येत्या रब्बी हंगामामध्ये शेतकऱ्यांना खते व बियाणे घेण्यासाठी प्रति हेक्टरी १० हजार रुपये प्रमाणे (३ हेक्टरच्या मर्यादेत) अतिरिक्त मदत देण्यात येणार आहे.

**पशुधनासाठी मदत**

जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत मोठे पशुधन, लहान पशुधन व कुक्कुटपक्षी मृत पावलेले आहेत. तसेच मच्छीमार जाळी, मत्स्यबीज, मत्स्य बोटींचे नुकसान झालेले आहे. याबाबत २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयातील निकष व दरानुसार मदत व पुनर्वसन विभागाकडून मदत देण्यात येणार आहे.

**पायाभूत सुविधांसाठी विशेष पॅकेज**

अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या ग्रामविकास, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा आणि ऊर्जा विभागांतर्गतच्या तातडीच्या व आवश्यक कामांसाठी रुपये १० हजार कोटींचे विशेष पॅकेज असून याबाबत प्रशासकीय, तांत्रिक व आर्थिक बावी संदर्भात संबंधित विभागाकडून नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेने स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येणार आहे.

अतिवृष्टी व पुर आपत्तीमुळे प्रभावित किंवा घोषित तालुक्यांमध्ये या उपाययोजना खरीप हंगाम २०२५ (जून ते ऑक्टोबर) साठी लागू राहणार आहे. लाभार्थ्यांना मदत वाटपाची कार्यवाही पूर्ण झाल्यावर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्ह्याच्या संकेतस्थळावर तसेच तालुका व गाव पातळीवर प्रसिद्ध करण्याच्या सूचना दिल्या असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

## विविध वृत्त...

### त्या घटनेतील आरोपी अद्यापही फरारच

**रिसोड/प्रतिनिधी :** गावातील शुल्लक वादाचे प्रकरण पुढे करून घोंसर येथील तरुणाला त्याच गावातील एका व इतर तरुणांनी १८ सप्टेंबर रोजी रिसोड येथील एका शाळेजवळ जबर मारहाण केली होती या घटनेला पंधरवडा उलटून गेला असला तरी अजूनही आरोपीचा शोध लागलेला नाही.

मागील कारणाचा वाद समोर करून क्रिकेटची बॅट व लोखंडी रॉड ने जबर मारहाण येथील सेनगाव मार्गावर बाबासाहेब धाबेकर इंग्लिश स्कूल समोर केली होती

सतिष प्रल्हाद जाधव वय ३६ वर्ष व्यवसाय शेती रा घोन्सर असे जखमी झालेल्या युवकाचे नाव आहे गावातील शेजारी शंकर दत्ताराव काळे याच्यासोबत सांड पाण्यावरून वाद झाला होता या वादाचे कारण पुढे करून दि १८ सप्टेंबर रोजी शंकर काळे विष्णू जाधव मंगेश काटे यांनी सतीश प्रल्हाद जाधव याला मारहाण केली होती सतीश जाधव हा गंभीर जखमी झाल्यामुळे त्याला प्रथम येथील ग्रामीण रुग्णालयात व नंतर अकोला येथे उपचाराकरिता पाठविण्यात आले सतीश जाधव याच्या जबानी रिपोर्ट वरून पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे या घटनेला पंधरवडा उलटून गेला असला तरी अजूनही आरोपी पकडण्यात पोलिसांना यश आले नसल्यामुळे पोलिसांच्या कार्य शैलीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

### १३ ऑक्टोबर: जिल्हा परिषद पंचायत समिती आरक्षण जाहीर; राजकीय दिग्गजांचे भविष्य धोक्यात

#### आरक्षण जाहीर होताच राजकीय रणभूमीत गडबड; नवोदित चेहरे व दिग्गज नेते, कोण टिकणार कोण हरणार?

**बुलढाणा/प्रतिनिधी :** येत्या १३ तारखेला जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे आरक्षण जाहीर होणार आहे. कोणत्या जागा कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित राहणार आहेत, हे ठरल्यावर राजकीय रणभूमीतील काही दिग्गज नेत्यांचे भविष्य मोठ्या प्रमाणात प्रभावित होऊ शकते, अशी चर्चा जोर धरत आहे.

राजकारणातील अनुभवी नेते आपली तयारी पूर्ण ठेवले आहेत, तर राजकारणात नवीन पाऊल टाकणाऱ्या युवकांसाठी हा सुवर्णसंधीचा सामना ठरणार आहे. आरक्षणाचा निर्णय कोणत्या समाजासाठी लागू होईल, यावर पुढील निवडणुकीतील उमेदवारी आणि पक्षीय रणनिती ठामपणे अवलंबून राहणार आहे.

विशेषज्ञांचे म्हणणे आहे की, आरक्षण जाहीर होताच राजकीय खेळ रंगत घेईल. काही नामांकित नेते बळकट राहतील, तर काहींच्या राजकीय भविष्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे १३ ऑक्टोबर राजकारणातील एक खास टर्निंग पॉइंट ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राजकीय समीक्षकांचे मत आहे की, या निर्णयानंतर कोणते चेहरे पुढे येतात, कोणते टिकतात, हे पाहणे वाचकांसाठी मनोरंजक ठरणार आहे.

## जनतेच्या सेवेसाठी नवा अध्याय, आमदार सिद्धार्थजी खरात यांच्या जनसंवाद कार्यालयाचे भव्य उद्घाटन



**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** जनतेच्या मनात घर करणारे, समस्यांच्या निराकरणासाठी सतत धावपळ करणारे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या जनसंवाद कार्यालयाचे भव्य उद्घाटन येत्या आज दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता होणार आहे. मेहकर शहराच्या विकास प्रवासात जनतेशी थेट संवाद साधण्यासाठी आणि त्यांच्या अडचणींना तत्काळ न्याय देण्यासाठी हे कार्यालय उभारण्यात आले आहे.

या जनसंवाद कार्यालयाचे उद्घाटन नितीन बापू देशमुख (शिवसेना), राजेंद्र शिंगणे (माजी आरोग्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) व आ. वरुण सरदेसाई (युवासेना सचिव, म.रा.) यांच्या शुभहस्ते होणार आहे.

कार्यक्रमाचे ठिकाण आमदार सिद्धार्थ खरात जनसंवाद कार्यालय, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), डोणगाव रोड, मेहकर.मेहकर-लोणार मतदारसंघातील नागरिकांच्या लहानमोठ्या प्रश्नांना उत्तर देणारे, जनतेसाठी नेहमी खुले असणारे हे कार्यालय म्हणजे एक "जनतेचा आवाज" ठरणार आहे. प्रत्येक नागरिकासाठी सहज उपलब्ध असलेले हे व्यासपीठ फक्त एक कार्यालय नाही, तर जनतेशी जुळणारा एक विश्वासाचा पूल आहे.

या सोहळ्याला विविध सामाजिक संस्था, महिला संघटना, शैक्षणिक व व्यापारी प्रतिनिधी तसेच हजारो शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या उपक्रमामागे "जनतेसाठी, जनतेच्या हितासाठी आणि जनतेच्या सोबत" अशीच आमदार खरात यांची भूमिका स्पष्टपणे दिसते.

मेहकर शहरात विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात या जनसंवाद कार्यालयाच्या माध्यमातून होणार असून, हा उपक्रम "जनतेचा नेता जनतेच्या दारी" या भावनेचा सुंदर प्रत्यय देणारा ठरणार आहे.

## मित्राने मित्राच्या मुलासाठी केली ५१ हजार रुपयांची मदत, शिक्षणासाठी उभारली मदतीची ध्येयधोरण

### बिबीतील किसन आटोळे यांच्या मुलांसाठी सामाजिक बांधिलकीचा आदर्श उपक्रम



**बिबी/प्रतिनिधी :** (लोणार तालुका) अकल्पित दु:खाने भरलेला दिवस! बिबी येथील किसन उर्फ बबन रावसाहेब आटोळे (वय ४४) यांचे आजारपणामुळे निधन झाले. गरीब परिस्थितीत वाढलेला परिवार पत्नी, एक मुलगा व एक मुलगी आता मोठ्या संकटात होता.

या संकटात स्थानिक मित्र व सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत मुलांच्या शिक्षणासाठी ५१ हजार रुपयांची आर्थिक मदत उभारली. बिबी ग्रामपंचायत सदस्य गजानन इंदोरिया यांनी ही मदत पुढाकाराने योजली आणि बिबी पोलिस स्टेशनचे ठाणेदार संदीप पाटील व त्यांच्या मुला मयुर इंदोरीया यांच्या हस्ते पैसे मुलांना सुपूर्द केले.

हा उपक्रम फक्त आर्थिक मदतपुरताच मर्यादित नाही, तर सामाजिक बांधिलकी आणि मित्रत्वाचे उत्तम उदाहरण ठरतो. ही मदत मुलांच्या पुढील शैक्षणिक कामासाठी निश्चितच महत्वाची ठरणार आहे.

या वेळी बिबी पोलिस स्टेशनचे ठाणेदार संदीप पाटील, भाजपा जिल्हा अध्यक्ष सोशल मीडिया देवानंद सानप, माजी सरपंच विठ्ठल आटोळे, पत्रकार भगवान नागरे, तसेच सामाजिक कार्यकर्ते कार्तिक धाईत आणि प्रफ ुल्ल इंदोरीया उपस्थित होते.

सामाजिक बांधिलकी जपताना मित्राने मित्राच्या मुलासाठी केलेल्या या आर्थिक मदतीला उपस्थितांमार्फत कौतुकाची दाद देण्यात आली. स्थानिक समाजात अशा उपक्रमांना प्रोत्साहन देणे गरजेचे असल्याचे सर्व उपस्थितांनी सांगितले.

## रिसोडमध्ये वंचित बहुजन आघाडीची महत्वपूर्ण आढावा बैठक संपन्न

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** राजकीय पक्ष आपला विस्तार करण्यासाठी अनेकदा छोटे-मोठे बदल करून कार्यकर्त्यांचे मनोधैर्य वाढवतात.याच धर्तीवर रिसोड येथील शासकीय विश्रामगृहात काल,गुरुवार (दि. ९) ऑक्टोबर रोजी वंचित बहुजन आघाडीची महत्वपूर्ण आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीत नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला, तसेच आगामी नगर परिषद,जिल्हा परिषद आणि पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टीने पक्षाने आतापासूनच रणशिंग फुंकले आहे.बैठकीच्या सुरुवातीलाच वीर जिवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. जिल्हाध्यक्ष दत्तराव गोटे यांच्या प्रमुख मार्गदर्शना खाली ही आढावा बैठक झाली. तालुका अध्यक्ष महेश तिडके यांनी अध्यक्षस्थान भूषविले होते. जिल्हा महासचिव प्रा. रंगनाथ धांडे, महिला जिल्हाध्यक्षा सौ. ज्योतीताई इंगळे,आणि भारिप बहुजन महासंघाचे माजी जिल्हाध्यक्ष डॉ.रविंद्र मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीच्या सुरुवातीलाच डॉ. रविंद्र मोरे यांनी प्रस्तावना मांडून बैठकीचा उद्देश स्पष्ट केला.यानंतर जिल्हाध्यक्ष गोटे, प्रा.रंगनाथ धांडे आणि सौ. इंगळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले,ज्यात पक्षाचे ध्येय-धोरणे आणि संघटनात्मक बांधणीवर भर देण्यात आला. त्यांनी कार्यकर्त्यांना स्थानिक निवडणुकीसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले.



आपले मनोगत व्यक्त करताना गिरिधर शेजुळ, प्रा.भास्कर गायकवाड, विनोद अंभोरे आणि दिलीप नवघरे यांनी रिसोड मधील पक्षाच्या विस्तारासाठी असलेल्या शक्यता आणि आगामी काळात करावयाच्या कामांची रूपरेषा स्पष्ट केली. विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षाला अधिक प्रभावीपणे उतरवण्यासाठी तसेच नवीन कार्यकर्त्यांना सक्रिय करण्यासाठी यावेळी सखोल चर्चा करण्यात आली. बैठकीला संचालक भिमराव शेजुळ,गोपाल पारिस्कर, माजी शहराध्यक्ष प्रदिप खंडारे, प्रमिलाताई अंभोरे,उत्तम झगडे, नारायण मिटकरी, सर्कल प्रमुख विनोद अंभोरे,केशव अंभोरे, विनोद भगत, दत्तराव जुमडे, अरुण बोरकर, प्रकाश गवई, शेख तोशिफ, डॉ जावेद, प्रल्हाद अल्हाट, साहेबराव नवघरे, शुभम सांवत, मंगेश राजुरकर, नागसेन धांडे, माधव खोडके, दाजीबा खरात, संदिप मोरे, सैय्यद नाझीम, शेख अकिब यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.